**फौजदारी जामीन अर्ज क्रमांक ५८/२०२६ मधील निशाणी १ खालील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम ४८२ अन्वये कळंब पोलीस स्टेशन गु.र.नं.१८५/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अन्वये दाखल झालेल्या गुन्हयामध्ये जामीन मिळण्याकरीता दाखल केला आहे. या अर्जाची पार्श्वभूमी थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

२. या प्रकरणातील फिर्याद पोलीस उप निरीक्षक बाळू जाधवर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांनी दिनांक १२.०५.२०२६ रोजी दाखल केली आहे. फिर्यादीचे असे कथन आहे की, दिनांक १०.०५.२०२६ रोजी सलमान खुरेशी, रा. केज, जि.बीड याने त्यांच्या कार्यालयामध्ये येवून अशी तक्रार दाखल केली की, तो कळंब येथे रिलॅक्स स्पा सेंटर चालवत आहे. कळंब येथील पोलीस अधिकारी सिध्दार्थ शिंदे आणि अशोक करवर त्याच्याकडून व्यवसाय चालवण्याकरीता हप्ता मागत आहेत. त्यांच्या मागणीप्रमाणे त्याने रुपये ५२,०००/- हप्ता दिलेला आहे. त्यानंतरही दिनांक ०६.०५.२०२६ रोजी पोलीस अधिकारी अशोक करवर याने रुपये २०,०००/- चा हप्ता मागितला. तसेच दिनांक ०७.०५.२०२६ रोजी पोलीस अधिकारी सिध्दार्थ शिंदे याने रुपये २०,०००/- चा हप्ता मागितला. तक्रारदार याची ही लाच देण्याची तयारी नाही, त्यामुळे त्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने फिर्यादीने दिनांक १०.०५.२०२६ रोजी पोलीस अधिकारी शिंदे आणि करवर हे लाचेची मागणी करतात का याची पंचासमक्ष खात्री केली. खात्री झाल्यानंतर दिनांक ११.०५.२०२६ रोजी सापळा लावण्यात आला. दिनांक ११.०५.२०२६ रोजी पोलीस अधिकारी अशोक करवर हा रोख रुपये ३६,०००/- तक्रारदाराकडून

लाच स्विकारताना पकडण्यात आला. त्यादिवशी पोलीस अधिकारी सिध्दार्थ शिंदे मात्र हजर नव्हता.

३. आरोपीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, आरोपी क्रमांक १ यास या न्यायालयाने जामिनावर मुक्त केले आहे. आरोपी क्रमांक २ हा घटनास्थळी हजर नव्हता. आरोपी क्रमांक २ याने लाचेची मागणी केली नाही किंवा लाच रक्कम स्विकारली नाही. गुन्हयाचा बहुतांश तपास पूर्ण झालेला आहे. या गुन्हयास जास्तीत जास्त ७ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा आहे. त्यामुळे हा अर्ज मंजूर करावा. आपल्या युक्तीवादाच्या पुष्टीकरीता आरोपीच्या वकिलांनी खालील निवाडे सादर केल आहेत.

अ. सय्यद शकील विरुध्द महाराष्ट्र शासन (क्रिमिनल अपिल १९७/२०१९ निकाल दिनांक ३०.०४.२०२४)

ब. निरज दत्ता विरुध्द दिल्ली प्रशासन (क्रिमिनल अपिल १६६९/२००९ निकाल दिनांक १५.१२.२०२२)

क. प्रभाकर तिवारी विरुध्द उत्तर प्रदेश शासन (क्रिमिनल अपिल १५२/२०२० निकाल दिनांक २४.०१.२०२०)

४. या उलट सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एस.कुलकर्णी यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपी क्रमांक २ याने सुध्दा फिर्यादीकडे लाचेची रक्कम मागितली होती. आरोपी क्रमांक २ याने आपल्या मोबाईलवरुन फिर्यादीला फोन करुन लाच रक्कम मागितली होती. आरोपी क्रमांक २ याचा मोबाईल जप्त करणे आवश्यक आहे. त्याकरीता त्याची पोलीस कोठडी आवश्यक आहे. सबब अर्ज नामंजूर करावा.

५. तपास अधिका-याने या प्रकरणातील कागदपत्रे न्यायालयासमोर

सादर केली आहेत. या कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक १०.०५.२०२६ रोजी आरोपी क्रमांक १ आणि २ हे फिर्यादीला भेटले होते. त्यावेळी आरोपी क्रमांक १ आणि २ यांनी फिर्यादीकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केलेली आहे. फिर्यादी आणि आरोपी दरम्यान झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरवर नोंदवले आहे. या व्हाईस रेकॉर्डवर नोंद झालेले संभाषणाची प्रत न्यायालयासमोर सादर केलेली आहे. या संभाषणावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, दिनांक १०.०५.२०२६ रोजी आरोपी क्रमांक २ याने सुध्दा फिर्यादीकडे लाच रक्कम मागितली आहे. दिनांक ११.०५.२०२६ रोजी मात्र आरोपी क्रमांक २ हजर नव्हता. केवळ आरोपी क्रमांक १ यास लाच रक्कम स्विकारताना पकडण्यात आले आहे. असे असले तरी सुध्दा आरोपी क्रमांक २ याने लाचेच्या रकमेची मागणी केलेली असल्यामुळे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ लागू होतो.

६. न्यायालयासमोर सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या गुन्हयाचा तपास अद्याप प्राथमिक पातळीवर आहे. या गुन्हयाच्या तपासाकरीता आरोपी क्रमांक २ च्या पोलीस कोठडीची आवश्यकता आहे.

७. वर नमूद कारणामुळे आरोपी क्रमांक २ चा हा जामीन अर्ज मंजूरीस पात्र नाही असा निष्कर्ष मी काढला आहे. या निष्कर्षावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**आदेश**

अर्ज नामंजूर केला आहे.

ANANT SIDDHESHWAR AWATE

Digitally signed by ANANT SIDDHESHWAR AWATE
Date: 2026.06.03 17:27:24 +0530

दिनांक – ०३.०६.२०२६.

(अ. सि. आवटे)
प्रभारी जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, कळंब.